# ट्यूलिप



’सिलसिला’ पिक्चर १९८१ मध्ये आला आणि ’देखा एक ख्वाब तो’ या गाण्याने सर्वांना वेड लावले. रेखा-अमिताभवरचे हे गाणे, नेदरलँड आणि पेहेलगामच्या ट्यूलिप गार्डनमध्ये साकारले होते .. आणि त्या सुंदर, स्वप्नवत वाटणाऱ्या ट्यूलिप गार्डनच्या तर मी प्रेमातच पडले होते. एक तर ट्यूलिप हे अतिशय देखणे, छान रंग असलेले फूल आहे आणि त्यात हजारोंच्या संख्येने गालिच्यासारखे, पसरलेले ! वाटायचे, स्वर्ग ह्याहून वेगळा असेल का? एकदा तरी हा नजारा प्रत्यक्ष बघायला मिळावा ही इच्छा होणे स्वभाविक आहे. आणि तशी संधी मला मिळाली.

अमेरिकेत सियाटलमधल्या Swagit Valley इथला ट्यूलिप फेस्टिवल बघायचा योग आला. वसंत ऋतुच्या सुरूवातीला, साधारण एप्रिलमध्ये ही फुले फुललेली असतात. ’सिलसिला’ मधला रंगीबेरंगी सुंदर गालिचा मला तिथे जवळून पहायला मिळाला.

ट्यूलिप हे नाव पर्शियन शब्द टर्बन ह्यापासून आले आहे. आता जरी सर्वत्र थंड भागांत हे फूल दिसत असले, तरी सुरवातीला, दक्षिण युरोप ते मध्य आशिया या भागात आढळले. आता नेदरलँडला जगातली ट्यूलिपची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. तिथून वर्षभरात ३ बिलीयन ट्यूलिपचे कंद, बिया, फुले जगभर पाठवले जातात. ट्यूलिपच्या ७५ मुख्य जाती आहेत. आणि इतर अनेक पोटजाती आहेत. निळा रंग सोडून सर्व रंगांत ही फुले पहायला मिळतात.

ट्यूलिपची झाडे १० सेंमी. ते ७१ सेंमी. इतक्या उंचीची असतात. एका झाडावर १ ते ४ फुले येऊ शकतात. पाने फांदीपासून येतात. ती संख्येने २ ते ६ असतात. काही जातींत १२ ही आढळतात. पाने थोडी निळसर हिरवी, मेणचट असतात. ट्यूलिपची फुले कप शेप किंवा स्टार शेप दिसतात. काही वेगळे रंग आणि वेगळी फुलेही तिथे पहायला मिळाली.

आपल्या मनात ट्यूलिप म्हणजे सुंदर कळीसारखे फूल हे पक्के बसले आहे. ४ ते ८ दिवसांत ती कळी इतकी उमलते, की आपल्याला प्रश्न पडतो, की अरे असे कसे हे ट्यूलिपचे फूल?

ट्यूलिपची पाने सुकली की कंद हलकेच काढून कोरड्या जागेत, अंधारात ठेवतात, फ्रिजमध्येही ठेवतात. उन्हाळा संपत आला की ते कंद, ४ ते ८ इंच खोल, आणि एकमेकांपासून ४ ते ६ इंच लांब लावतात . ह्याच्या चपट्या बिया असतात. कंदांपासून दरवर्षी फुले येतात. बियांपासून लावलेल्या झाडांना ६ वर्षांपेक्षा जास्त वेळ, फुलं यायला लागतो. चांगली निचरा होणारी जमीन आणि सूर्यप्रकाश ह्या झाडांना लागतो. पण काही झाडे मोठ्या झाडांच्या सावलीतही वाढतात. कुंडीतही वाढतात. बागेच्या कडेला ह्या फुलांची रांग लावणे अनेक जण पसंत करतात. खूप उन्हात, पावसात, रात्री ही फुले मिटतात आणि आतल्या नाजूक भागांचे रक्षण करतात.

१५५४ सालापासून पर्शियन भाषेत ह्या फुलांचा उल्लेख आढळतो. तुर्की लोकांच्यात ह्या फुलाला खूप पवित्र मानतात. तुर्की विमानांवर करड्या रंगाचे ट्यूलिपचे फूल आहे. इराणच्या २० रियालच्या नाण्यावर, एका बाजूला २२ आणि दुसऱ्या बाजूला ३, ट्यूलिपची फुले कोरली आहेत. आपल्याला हे लोकप्रिय फूल टाईल्स, कपडे, मशिद, काचेच्या वस्तू इत्यादी अनेक ठिकाणी पहायला मिळते.

शिरीन - फरहाद ची प्रेमकथा प्रसिध्द आहे. शिरीनच्या मृत्यूची (खोटी) खबर फरहादला कळल्यावर, तो दु:खाने वेडापिसा होतो, आणि कड्यावरून घोड्यासकट जीव देतो. त्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून लाल ट्यूलिप आले अशी आख्यायिका आहे. म्हणून लाल ट्यूलिप खऱ्या प्रेमाचे प्रतीक मानतात. डच ट्यूलिप्स त्यासाठी प्रसिध्द आहेत. ट्यूलिप हे समृध्दीचेही प्रतिक मानतात. ह्या फुलांपासून ॲलर्जी होऊ शकते.

श्रीनगरच्या जबरवान डोंगराच्या भागांत २५ मार्च २०१८ रोजी, इंदिरा गांधी मेमोरियल नावाचे, आशिया खंडातले सर्वात मोठे ट्यूलिप गार्डन सुरू झाले आहे. तिथे १२ लाख ट्यूलिपचे कंद लावले आहेत. गार्डन पहाण्यासाठी जगभरातून प्रवासी येत आहेत. हॉलंड, इंग्लंड आणि जगात इतर अनेक ठिकाणी ट्यूलिप पहायला पर्यटक उत्सुक असतात.

ट्यूलिपवरची माझी कविता आणि काढलेली चित्रं व ओरिगामीची ट्यूलिपची फुले............









कविता.....

अस्मानी छता खाली
...भरली रंगांची मैफिल

सोनेरी किरणं आली
..पवनही झाला सामिल!

त्याच्या साथीने मस्त
....पर्णांनी धरला ताल

पाऊस होता सुस्त
...नाहीतर होते ना हाल!

लाल रंगांचा होता दबदबा
प्रेमाचे प्रतिक हा त्याचा दावा

पांढरा शुभ्र, मंद शांतीचा
नेहमीच हेका त्याचा माफीचा

पिवळा नाचे घेऊनी उर्जेचा फतवा
आनंद वाटताना येईना त्याला थकवा

केशरी रंगांचा नेहमीच हंगामा
शक्ती प्रदर्शनात, अभिमान आम्हा

गुलाबी रंग फिरतो, घेऊनी आशा
कोमलतेने, मिरवी सौंदर्याचा ठसा

जांभळा, नेहमीच भुकेला मैत्रीसाठी
आदराने प्रेरणा देत, समृध्दीचा घेतो ध्यास.

रंगांच्या ह्या दुनियेची, किमयाच महान
ट्यूलिपच्या फुलात, या सौंदर्याची खाण!

**.........चित्रा मेहेंदळे**